पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिती समिती,

कार्यपत्रिका क्र.६

सभावृत्तांत

दिनांक ०५/०९/२०१४ वेळ दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे सप्टेंबर २०१४ ची मासिक सभा शुक्रवार दि. ०५/०९/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता ड क्षेत्रिय कार्यालयाच्या छत्रपती शाहू महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस पुढीलप्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा. श्रीमती आरती चोंधे | अध्यक्ष, |
| २. मा. श्री. कैलासभाऊ गबाजी थोपटे | सदस्य |
| ३. मा.श्री. रामदास गेणभाऊ बोकड | सदस्य |
| ४. मा.श्रीमती वैशाली राहुल जवळकर | सदस्य |
| ५. मा. श्री. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे | सदस्य |
| ६. मा. श्री. गौतम सुखदेव चाबुकस्वार | सदस्य |
| ७. मा. श्रीम. उषा संजोग वाघेरे (पाटील) | सदस्य |
| ८. मा. श्रीमती निता विलास पाडाळे | सदस्य |
| ९. मा. श्रीमती अनिता मच्छिंद्र तापकीर | सदस्य |
| १०. मा. श्री. विलास एकनाथ नांदगुडे | सदस्य |
| ११. मा. श्रीमती. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे | सदस्य |
| १२. मा. श्री. राजेंद्र गणपत जगताप | सदस्य |

--------------

याशिवाय मा. दत्तात्रय एम. फुंदे, प्रभाग अधिकारी, मा.मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी, तथा सचिव,सभा शाखा, मा.गुलाब दांगट, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा. रामदास तांबे, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा, मा. सोनवणे, उपअभियंता स्थापत्य,मा. रामदास टकले, उपअभियंता स्थापत्य, मा.रविंद्र पवार, उपअभियंता जलनिसारण विभाग, मा. एस. टी. आव्हाळे, लेखाधिकारी, मा. सहा. आरोग्य अधिकारी बेंडाळे, मा.जाधव, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. पाडवी, कनिष्ठ अभियंता विद्युत , मा. मुलाणी, मा. इदे, कनिष्ठ अभियंता जलनि:सारण इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

प्रशासन अधिकारी तथा सचिव, ड प्रभाग समिती यांनी मागील सभा कार्यपत्रिका क्र. ५ चा सभावृत्तांत कायम करण्यात यावा अशी सूचना मांडली.

मा. अध्यक्ष : मागील सभा कार्यपत्रिका क्र. ५ चा सभावृत्तांत कायम करण्यात येत आहे.

तदनंतर मा. सदस्य यांचे मागणीप्रमाणे व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने खाली नमूद केलेप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्र. १ -** प्रभाग क्र. ५४ पिंपळे निलख विशालनगर येथील स.नं. २६ साठे कॉर्नर पाटबंधारे रस्ता ते शोले हॉटेल या रस्त्याचे कै. नारायण नामदेव साठे पथ, स.नं. २९ बी.आर.टी.रस्ता ते श्री गुरुकृपा हौसिंग सोसायटी रस्त्याचे कै. गजानन गणपत मेंगळे पथ , पिंपळे निलख येथील आदर्शनगर भोसले चाळ समोरील रस्त्यास कै. आनंद भोसले चौक, आदर्शनगर रस्ता ते गणेशनगर मुख्य रस्त्यास राजमाता अहिल्यादेवी होळकर चौक, स.नं. २५, २६ विशालनगर पाटबंधारे रस्ता मुळा नदीवर होणा-या घाटास कै. ज्ञानोबा चोंधे (माऊली घाट) असे नामकरण करणे

**विषय क्र. २ -** पिंपळे निलख येथील शारदा कॉलनी येथील स.नं. ४३/३ए/१ येथील दोन मोकळया जागा खेळाचे मैदान व लहान मुलांसाठी बाग करण्यासाठी महापालिकेकडे हस्तांतरीत करणे व खेळाचे मैदानास राणी लक्ष्मीबाई क्रीडांगण व लहान मुलांसाठी होणा-या बागेचे पारिजात बालोद्यान व सभागृह असे नामकरण करणे

**विषय : ३ -** ड क्षेत्रिय कार्यालय पाणी पुरवठा विभागाकडील "स्थायी आस्थापना" या लेखाशिर्षावरील र.रु. ६०,०००/- तरतुद "अस्थायी आस्थापना" या लेखाशिर्षावर वर्ग करणे

**विषय क्र. ४ -** ड क्षेत्रिय कार्यालय आरोग्य विभागाकडील अस्थायी आस्थापना लेखाशिर्षाविरुन छपाई या लेखाशिर्षावर तरतुद वर्ग करणे तसेच "वाहन इंधन" या लेखाशिर्षावरुन "वाहन निर्वाह" या लेखाशिर्षावर तरतुद वर्ग करणे

**विषय क्र. ५ -** प्रभाग क्र. ४५ मधील पिंपरी वाघेरे या ठिकाणी तपोवन रस्त्यावरील चौकास श्री संत ज्ञानेश्वर महाराज (माऊली) चौक, पिंपरी गाव ते काटे पिंपळे जुना रोड हयामधील एका चौकास न्हावी आळी , न्हावी आळीमध्ये वाळुंजकर वाडा असे नामकरण करणे, न्हावी आळी मधील एक स्वातंत्र्य सैनिक आहेत त्यांचे नावाचे फलक बनविण्यात यावेत

----------

ठराव क्र. ११ — विषय क्र. १

दिनांक ०५/०९/२०१४ — विभाग – स्थापत्य

सुचक – मा. आरती चोंधे — अनुमोदक – मा. नीता विलास पाडाळे

संदर्भ : मा. आरती चोंधे यांचा दि. १/९/२०१४ रोजीचा प्रस्ताव

विषय क्र. १ प्रभाग क्र. ५४ पिंपळे निलख विशालनगर येथील स.नं. २६ साठे कॉर्नर पाटबंधारे रस्ता ते शोले हॉटेल या रस्त्याचे नामकरण "**कै. नारायण नामदेव साठे पथ**", स.नं. २९ बी.आर.टी.रस्ता ते श्री गुरुकृपा हौसिंग सोसायटी रस्त्याचे नामकरण " **कै. गजानन गणपत मेंगळे पथ**" , पिंपळे निलख येथील आदर्शनगर भोसले चाळ समोरील रस्त्यास "**कै. आनंद भोसले चौक**", आदर्शनगर रस्ता ते गणेशनगर मुख्य रस्त्यास "**राजमाता अहिल्यादेवी होळकर चौक**", स.नं. २५, २६ विशालनगर पाटबंधारे रस्ता मुळा नदीवर होणा-या घाटास "**कै. ज्ञानोबा चोंधे (माऊली घाट)**" असे नामकरण करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------------

ठराव क्र. १२ — विषय क्र. २

दिनांक २२/०३/२०१४ — विभाग – स्थापत्य

सुचक – मा.विलास नांदगुडे — अनुमोदक – मा. आरती चोंधे

संदर्भ : मा. विलास नांदगुडे यांचा दि. ५/९/२०१४ रोजीचा प्रस्ताव

पिंपळे निलख येथील शारदा कॉलनी येथील स.नं. ४३/३ए/१ येथील दोन मोकळया जागा खेळाचे मैदान व लहान मुलांसाठी बाग करण्यासाठी महापालिकेकडे हस्तांतरीत करणे व खेळाचे मैदानास "**राणी लक्ष्मीबाई क्रीडांगण**" व लहान मुलांसाठी होणा-या बागेचे नामकरण "**पारीजात बालोद्यान व सभागृह**" असे नामकरण करणे च्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------------

ठराव क्र. १३ — विषय क्र. ३

दिनांक ०४/०९/२०१४ — विभाग – पाणीपुरवठा

संदर्भ : ड क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील विषय क्र.डक्षे/पापु/१/कावि/८८१/२०१४ दि. ४/९/२०१४ रोजीचा प्रस्ताव

ड क्षेत्रिय कार्यालयाचे पाणीपुरवठा विभागाकडे मानधनावर काम करणा-या कर्मचा-यांची मानधनाची बिले "अस्थायी अस्थापना" या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेत येतात. सदर

लेखाशिर्षावर सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये र.रु. ५०,०००/- इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. माहे जुलै २०१४ अखेर सदर "अस्थायी अस्थापना" या लेखाशिर्षावरुन र.रु. ४५,६००/- इतकी तरतुद खर्ची पडली असुन र.रु. ४४००/- इतकी तरतुद शिल्लक आहे. पाणीपुरवठा विभागाकडील कोपा व प्लंबर प्रशिक्षणार्थी कर्मचा-यांची मागील वर्षातील काही मानधन बिले या आर्थिक वर्षात खर्ची पडलेने व चालू आर्थिक वर्षातील मानधन बिलांकरीता उपलब्ध तरतुद कमी शिल्लक असलेने पाणीपुरवठा विभागाकडील "अस्थायी अस्थापना" या लेखाशिर्षावर तरतुद वर्ग करणे आवश्यक असलेने पाणीपुरवठा विभागाकडील "स्थायी अस्थापना" या लेखाशिर्षावर सध्या शिल्लक असलेली रक्कम रुपये १,९९,५६,४७१/- या तरतुदीमधुन "अस्थायी अस्थापना" या लेखाशिर्षावर र.रु. ६०,०००/- इतकी रक्कम वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------------

ठराव क्र. १४ विषय क्र. ४

दिनांक ०४/०९/२०१४ विभाग – आरोग्य

संदर्भ : ड क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील विषय क्र.डक्षे/कावि/११९७/२०१४ दि. ४/ ९/२०१४ रोजीचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड ड क्षेत्रिय कार्यालयाचे आरोग्य विभागाकडील कचरा वाहतुक विभागासाठी वेळोवेळी वाहनांचे लॉगशीट हे मध्यवर्ती भांडार विभागाकडून उपलब्ध करुन दिले जातात. परंतु काही वेळेस मध्यवर्ती भांडार विभागाकडे लॉगशीट उपलब्ध नसल्यास ते कोटेशन काढून छपाई करुन घ्यावे लागतात. त्यासाठी येणारा खर्च हा आरोग्य विभागाचे "अस्थापना" या लेखाशिर्षावरील आकस्मिक खर्च परिशिष्ट ब मधील छपाई या लेखाशिर्षावरुन खर्ची टाकण्यात येतो. सदर लेखाशिर्षावर सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये र.रु. १०,०००/- इतकी तरतुद करणेत आलेली आहे. सद्यस्थितीत मध्यवर्ती भांडार विभागाकडे लॉगशीट उपलब्ध नसलेने कोटेशन काढुन लॉगशीट छपाई करुन घेणेत आलेले आहे. त्यासाठी र.रु. १३,५००/- इतका खर्च आलेला असुन या शिवाय कचरा वाहतुक विभागाकडील वाहने दुरुस्तीकामी कार्यशाळा विभागाकडे पाठविणेकामी विहीत नमुन्यातील अर्जाची छपाई करुन घेणेसाठी अंदाजे र.रु. ५०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. या दोन्हीही बाबींसाठी लागणारा खर्च पाहता आरोग्य विभागाकडील "अस्थापना" या लेखाशिर्षावरील कार्यालयीन आकस्मिक खर्च परिशिष्ट ब मधील छपाई या लेखाशिर्षावर तरतुद कमी पडत असलेने सदर लेखाशिर्षावर र.रु. २०,०००/- इतकी तरतुद आरोग्य विभागाकडील "अस्थायी अस्थापना" या लेखाशिर्षावर असलेल्या र.रु. ५०,०००/- मधुन वर्ग करणेस तसेच आरोग्य विभागाकडील कचरा वाहतुक विभागाकडील वाहनांचे किरकोळ दुरुस्ती व पंक्चर बिले यासाठी माहे जुलै २०१४ अखेर र.रु. १,८६,३९०/- इतका खर्च झाला असुन र.रु. १३,६१०/- इतकी तरतुद शिल्लक आहे. सद्यस्थितीत कचरा वाहतुक विभागाकडे असणा-या टाटा एसीई ४८ व कॉंपॅक्टर व इतर ४९ अशी एकूण ९७ वाहनांसाठी दरमहा र.रु. २०,०००/- इतका खर्च पंक्चरचे कामासाठी अपेक्षित असुन माहे जुलै २०१४ ते ३१ मार्च २०१५ या कालावधीसाठी वाहन निर्वाह या लेखाशिर्षावर आणखी र.रु. १,८०,०००/- इतकी तरतुद वर्ग करणे आवश्यक असल्याने आरोग्य विभागाकडील महसुली खर्च तरतुद रजिस्टर मधील वाहन निर्वाह या लेखाशिर्षावर र.रु. १,८०,०००/- इतकी तरतुद "वाहन इंधन" या लेखाशिर्षावरील असलेल्या तरतुद र.रु. २,००,००,०००/- मधुन "वाहन निर्वाह" या लेखाशिर्षावर तरतुद वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------------

ठराव क्र. १५ विषय क्र. ५

दिनांक ०४/०९/२०१४ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.उषा संजोग वाघेरे (पाटील) अनुमोदक – मा. नीता पाडाळे

संदर्भ : मा. उषा संजोग वाघेरे (पाटील) यांचा दि. ५/९/२०१४ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४५ मधील पिंपरी गाव ते काटे पिंपळे जुना रोड ह्यामधील एका चौकास **"न्हावी आळी"** , न्हावी आळीमध्ये **"वाळुंजकर वाडा"** असे नामकरण करणेस, तसेच न्हावी आळी मधील **एक स्वातंत्र्य सैनिक आहेत त्यांचे नावाचे फलक बनविण्यास** मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------------

यानंतर आरोग्य स्थापत्य , पाणीपुरवठा, पशुवैद्यकीय व जलनि:सारण विभागाचे कामकाजास अनुसरुन खालीलप्रमाणे मा. सदस्यांनी त्यांचे मत व्यक्त केले.

मा. नीता पाडाळे:- आरोग्य विभागाकडून स्वप्ननगरी या ठिकाणी दोन महिने कचरा गाडया आलेल्या नसलेचे निदर्शनास आणुन दिले. सदर ठिकाणी पक्का रस्ता नसल्याने आरोग्य विभागाचे कर्मचारी गाडी आणता येत नसलेचे तक्रार करतात. सदर ठिकाणी तातडीने रस्ता करण्यात यावा तसेच धुरीकरणाची गाडी नियमित पाठविणेत यावी. तसेच स्टॉर्म वॉटर पाईपलाईनचे काम पाठपुरावा केल्यानंतरच सुरु करणेत आलेले असल्याचे निदर्शनास आणुन दिले.

**मा. कैलासभाऊ थोपटे** : कचरा उचलण्याच्या कामावर योग्य नियंत्रण नसल्याने वेळेवर कचरा उचलला जात नाही. कचरा उचलण्यासाठी ट्रकची आवश्यकता आहे. प्रभाग अधिकारी यांनी या बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

**मा. श्री. शत्रुघ्न काटे** : पिंपळे सौदागर येथे ज्या पध्दतीने ११० सोसायटयांमधील कचरा उचलण्याची कार्यवाही करण्यात येत आहे त्या पध्दतीने संपुर्ण ड प्रभाग परिसरात कार्यवाही करण्यात यावी.

सहा. आरोग्याधिकारी श्री. बेंडाळे – नवीन गाडया आल्यानंतर सर्व प्रभागांसाठी नियोजन करता येईल.

क्षेत्रिय अधिकारी श्री. फुंदे – सहा. आरोग्याधिकारी, आरोग्य निरीक्षक यांनी स्वत: प्रत्यक्ष पाहणी करुन तातडीने आवश्यक ती कार्यवाही करावी.

मा. श्री. शत्रुघ्न काटे – गाडीचे नियोजन कधी होईल याबाबत प्रभाग अधिकारी यांनी खुलासा करावा

क्षेत्रिय अधिकारी श्री. फुंदे – ड प्रभागासाठी दोन कॉंपॅक्टर अथवा चार ट्रक मिळणेसाठी आरोग्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे या पूर्वीच पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

**मा. श्री. कैलासभाऊ थोपटे** – स्टॉर्म वॉटर ड्रेनचे चेंबर्स आतापर्यंत किती स्वच्छ करण्यात आले आहेत याची माहिती पुढील प्रभाग समितीमध्ये सादर करावी. ज्या ज्या ठिकाणी स्टॉर्म वॉटर ड्रेनची कामे करण्यात आली आहेत त्या ठिकाणी स्लोप करण्यात आलेला नाही. कामाचा दर्जा निकृष्ठ आहे.

**सहा. आरोग्याधिकारी श्री. बेंडाळे** – आतापर्यंत १८६ चेंबर्स साफ करण्यात आलेली आहेत. मा.

**मा. श्री. शत्रुघ्न काटे** – एका ड्रेनेज लाईनवर ५०० कनेक्शनची क्षमता असुन त्या ठिकाणी क्षमतेपेक्षा जास्त कनेक्शन देणेत आलेली आहेत. स्टॉम वॉटरला पाणी जाणेसाठी जागा शिल्लक नाही.तसेच स्टॉर्म वॉटर ड्रेनेजच्या चेंबरची झाकणे रात्रीचे वेळी चोरीस जात आहेत. या कामी पोलीस कंम्प्लेंट करणेत यावी तसेच सध्याचे स्टार्म वॉटर ड्रेनेजचे कामासाठी पर्यायी मार्ग काढणे आवश्यक आहे. भविष्यातील वाढणा-या लोकसंख्येचा विचार करुन ड्रेनेज लाईनचे काम करणे आवश्यक आहे. जलनि:सारण विभागाकडील अडचणींचा विचार करता कार्यकारी अभियंता जलनि:सारण ड क्षेत्रिय कार्यालय श्री. काची यांना पुढील सभेस उपस्थित राहणेकामी सूचना देणेत याव्यात.

**मा. श्रीमती पाडाळे** – ड्रेनेज लाईनचे कामासाठी अंदाजपत्रकीय तरतुद खुप कमी आहे. ठेकेदारांची फक्त दोन माणसे काम करतात ती वाढवावी.

**मा. श्रीमती तापकीर** – पाणीपुरवठा विभाग, विद्युत व आरोग्य विभागाचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे चांगल्या कामाबाबत अभिनंदन करते. जलनि:सारण विभागाने त्यांचे कामात सुधारणा आणावी. ड प्रभाग क्षेत्रात कुत्र्यांचा प्रादुर्भाव खुप असुन याबाबत पशु वैद्यकीय विभागाकडून योग्य ती कारवाई करण्यात येत नाही.

पशुवैद्यकीय विभागाचे कामकाजाबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली. त्याबाबत मा.श्री. राजेंद्र जगताप , मा. श्रीमती पाडाळे यांनीही तीव्र नाराजी व्यक्त केली. प्रभागातील काही ठिकाणी डुकरांचा प्रादुर्भाव प्रचंड असल्याने त्याबाबतही पशु वैद्यकीय अधिकारी यांचेकडून काहीही कार्यवाही करण्यात येत नसलेबाबत मा. श्री. बोकड, मा. श्री. जगताप यांनी नाराजी व्यक्त केली.

**मा. श्री. रामदास बोकड** - पशु वैद्यकीय विभागाकडील ज्या संस्थेला काम देणेत आलेले आहे त्या संस्थेच्या कर्मचा-यांना मराठी भाषा समजत नाही. वैदुवस्ती येथे डुक्कर व कुत्रे पकडणारे लोक आहेत, पशुवैद्यकीय विभागाने मागणी केल्यास त्यांना मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात येईल, मात्र त्वरीत कारवाई करण्यात यावी.

मा. श्री. काटे, मा. श्रीमती पाडाळे, मा. अध्यक्षा श्रीमती चोंधे, मा. श्री. काटे मा. श्रीमती शितल काटे :- सद्यस्थितीत ड प्रभाग हद्दीतील पाणीपुरवठयाच्या वेळेबाबतचे नियोजन बदलावे. प्रभागातील काही ठिकाणी रात्रीच्या वेळेस पाणीपुरवठा करण्यात येतो किंवा काही ठिकाणी दुपारचे कालावधीत करण्यात येतो त्यामुळे सर्वसामान्य नोकरवर्गातील नागरीकांना पाणी मिळत नाही.

**मा.कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा श्री. रामदास तांबे** – गेल्या २-३ दिवसात पाणी गळतीचे प्रसंग उद्भवल्यामुळे काही ठिकाणी पाणी पुरवठयामध्ये अडथळे आले होते. तसेच काही भागांमध्ये झोनिंग करुन टाकी पूर्णक्षमतेने भरुन घेऊन नंतर पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

मा.श्रीमती पाडाळे, मा. श्री. काटे, मा.श्रीमती काटे, मा. श्री. कैलासभाऊ थोपटे – पाणी पुरवठयाच्या वेळांचे पुनर्नियोजन करावे.

**मा. श्री. रामदास बोकड** - सुदर्शननगर येथील केबल आतापर्यंत सहा वेळा तोडलेली आहे. सदर ठिकाणी एक नारळाचे झाड आहे. सदर झाड खाजगी मालकीचे असुन महावितरणने महापालिकेस सदर ठिकाणी असलेल्या नारळाच्या झाडामुळे केबलचे नुकसान होत असलेबाबत कळविले आहे. उद्यान विभाग याबाबत काहीही कार्यवाही करत नाही.

**उद्यान निरीक्षक श्री.गोसावी** – सदर बाबत मा. अतिरिक्त आयुक्त सो. यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. त्वरीत कार्यवाही करणेत येईल.

**मा. श्री. राजेंद्र जगताप** – ड प्रभाग समितीच्या पुढील सभेस ड क्षेत्रिय कार्यालयाकडील सर्व विभागप्रमुख, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, आरोग्य निरीक्षक यासह बीआरटी, पशुवैद्यकीय, उद्यान, महावितरण इत्यादी सर्व विभागांचे विभागप्रमुख उपस्थित नसल्यास सभेच्या कामकाजाचा निषेध करुन मा. आयुक्त यांना प्रभाग समितीच्या वतीने लेखी निवेदन देणेत येईल.

तदनंतर मा. अध्यक्षा यांनी बैठक संपल्याचे जाहीर केले.

सही/-

(आरती चोंधे )
**सभापती**
ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी ४११०१७

क्रमांक – ड/१३/कावि/७६/२०१४
दिनांक –१३/०९/२०१४

सही/-

**प्रशासन अधिकारी तथा**
सचिव (सभाशाखा)
ड प्रभाग समिती